अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर
जा.क्र.स्टोअर विभाग - ४३६
दिनांक.१३ /११/२०१८.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

## जाहिर टेंडर नोटीस

अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ करिता ६ निवडणूक निर्णय अधिकारी व मतमोजणीच्या ठिकाणी CCTV कॅमेरे रेकॉर्डींग मॉनिटरींगसह भाडेतत्वावर बसविणेकामी पुरवठादार,उत्पादक / अधिकृत विक्रेते यांचेकडून टेंडर फॉर्ममधील नमुद अटी,शर्ती नुसार दोन लिफाफे पध्दतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा संदर्भातील अटी,शर्ती तसेच संपूर्ण मालाचा तपशिल याबाबत आवश्यक माहिती निविदा फॉर्म विक्री कालावधीत महानगरपालिका मध्यवर्ती स्टोअर विभाग कार्यालयात कार्यालयीन वेळेत समक्ष पहावयास मिळेल.

निविदा फॉर्म विक्री दि. १४/११/२०१८ ते दि. १६/११/२०१८ अखेर पर्यंत प्रत्येक टेंडर फॉर्मला रु.१,२००/-फक्त याप्रमाणे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते दुपारी ४.३० पर्यंत स्टोअर किपर अहमदनगर महानगरपालिका यांजकडून केली जाईल व सिलबंद निविदा बयाणा रक्कम रु.६,०००/-फक्तसह सोमवार दि. १७/११/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी ४.३० वाजता उघडण्यात येतील.

**कामाचा तपशिल**

१) अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ चे कामकाजा करिता नियुक्त करण्यात आलेल्या ६ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये प्रत्येकी ४ नग याप्रमाणे एकूण २४ नग CCTV कॅमेरे रेकॉर्डींग मॉनिटरींगसह निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भाडेतत्वावर बसवून रेकॉर्डींगचे बॅकप हार्डडिस्कमध्ये मनपास देणेसह.

२) अहमदगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ चे मतमोजणीच्या ठिकाणी दोन दिवस एकुण ३२ CCTV कॅमेरे रेकॉर्डींग मॉनिटरींगसह बसवून रेकॉर्डींगचे बॅकप हार्डडिस्कमध्ये मनपास देणेसह.

उपायुक्त (सा.)
अहमदनगर महानगरपालिका

**प्रत :-** मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब,अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस्तव सविनय सादर

**प्रत :-** प्रसिध्दी विभाग प्रमुख,अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस एकाच स्थानिक मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.

**प्रत :-** हवलदार,अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस महानगरपालिका नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.

**प्रत :-** संगणक विभाग प्रमुख,अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस अ.नगर मनपा बेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.